अपेक्षांचा महासागर---( पालकांचा ही )

" मला ही प्रोसेस च नको वाटते. कुठेतरी नाव नोंदवायचे  आणि मग कोणत्याही मॉल मध्ये जसे ड्रेस बघायचे ना तसे कॉम्पुटर वर मुलं शोधायची .... मग त्यांचे ते अगदी अनप्रोफेशनल फोटो पहायचे,  त्याच्या चेहऱ्यावरच्या रेषांवरून त्याला जोखायचे आणि मग त्यातल्या त्यात बरा वाटला ( म्हणजे आईला बरा वाटला तर ...) तर त्याला इंटरेस्ट पाठवायचा. त्यातून मुलांचे फोटो तर काय दिव्य असतात , बहुतेक मुलं फोटो गॉगल मधले का देत असतील ?  मी नाही बघणार .........." सायली वैतागली होती.

"अग पण मग काय करायचं? आपण तुझ्यासाठी स्थळे पाहायचीच नाहीत ? –" सायलीची आई  पौर्णिमाताई.

" स्वतःला दाखवून काय घ्यायचे ? येईल त्याची वेळ झाल्यावर माझ्या समोर ...." ---सायली.

" तर तर मोठी लागून गेल्येय .. म्हणे येईल समोर !!!" ---इति  पौर्णिमा ताई.

माझ्या समोरच दोघींची वादावादी चालली होती.

---

हर्षल  आणि त्याचे बाबा आले होते. हर्षल  एका मुलीला- स्वप्नालीला  भेटला होता.  एकदा दोनदा नाही तर चांगला चार वेळा भेटला होता. हर्शल च्या बाबांना आणि आईला देखील स्वप्नाली खूप आवडली होती. शिक्षण ,  उंची,  दोघांच्या वयातले अंतर, शिवाय आर्थिक परिस्थिती अगदी जुळेल अशी होती.  दिसायला पण स्वप्नाली छान होती. शिवाय त्यांच्या मते थोडीशी नम्र पण होती. पण चार वेळा भेटून देखील हर्षल होकाराच्या निर्णयापर्यंत पोचत नव्हता.

त्याच्या आई बाबांना आता टेन्शन आले होते.   " किती वेळा भेटणार ना ? झाले आता चार वेळा भेटून. आणि १५/२० मिनिटे नाही तर चांगले दीड दीड तास भेटले आहेत प्रत्येक वेळी. शेवटी काय आहे ना २० भेटी घेतल्या तरी त्या कमीच वाटतील.

आणि आम्हाला पण स्वप्नालीच्या आई वडिलांना काही तरी सांगायला पाहिजे. आणि आता नकार द्यायचा तर ते म्हणतील मग भेटला कशाला  चार चार वेळा ?  कसा तिढा सुटायचा ? आणि उगीच काय नकार द्यायचाय ? म्हणे क्लिक होत नाहीये. मग भेटलास तरी कशाला इतक्या वेळा ?? " – हर्षल च्या बाबांचा पारा  हळू हळू चांगलाच चढू लागला होता.

" पण बाबा , मला नाही वाटत ती माझ्या साठी योग्य आहे असं.  असं का वाटतंय ते मात्र मी नाही सांगू शकत. तुम्ही म्हणताय ते पटतं मला. पण केवळ तिढा सोडवायचा म्हणून तिला होकार द्यायचा ? ती चांगली आहे. अगदी सर्वार्थाने, पण मला होकार द्यावा असे नाही वाटत. माझ्यासाठी ती योग्य  नाही  असं वाटतंय. "

---

असे अनेक प्रसंग माझ्या समोर सातत्याने , अगदी जवळ जवळ रोज घडत असतात.  आणि लग्न ही गोष्ट मुले - मुली जेव्हा लांबणीवर टाकत असतात, त्यावेळी पालक अस्वस्थ होतात. आणि पालक हात धुवून मागे लागले कि मुले मुली अस्वस्थ होतात. का टाकत असतील मुले – मुली लग्न लांबणीवर ? कोणतीही डिग्री घेताना मुले  मुली केव्हढा तरी अभ्यास करतात, मग लग्ना सारखी आपल्या आयुष्यातली इतकी महत्वाची गोष्ट  - त्याबद्दल मुले मुली का विचार करत नसतील ? लग्न हा विषय ऑप्शन ला टाकल्यासारखे का करत असतील ?

याचा विचार करताना मला काही मुद्दे लक्षात येतात ......

१) **पालकांचे नियंत्रण**

आपल्या मुला मुलीचे लग्न जर का ते अरेंज्ड marriage असेल तर पालकांचे नियंत्रण खूप जास्त असलेले दिसते.

मला माझा पार्टनर कसा हवाय याचा विचार मुला-मुलींनी करण्यापेक्षा त्यांचे आई वडीलच याचा विचार जास्त करतात. म्हणजेच मला जावई कसा हवा किंवा मला माझी सून कशी हवी याचा विचार जास्त होताना दिसतो.

आणि त्याबद्दल घरात जरा जास्तच चर्चा होताना दिसते.

" सोनाली तुला आधीच सांगते, नवरा चांगला रुबाबदार हवा हं . माझ्या मैत्रिणींच्या सगळ्या जावयांपेक्षा माझा जावई चांगला उठून दिसला पाहिजे माझ्या ग्रुप मध्ये !! आणि उंच , भरपूर पैसे मिळवणारा ही हवा. तुला किती सुखात वाढवलंय आम्ही....अगदी तळहातावरच्या फोडासारख जपलंय..."

---"-अभी , तू तिला भेटायला जाशील तेव्हा स्मार्टली सगळं विचारून घे. स्वयंपाक येत नसला समजा तरी शिकायची तयारी असायला हवी. आणि नोकरी पण हवी बर का... कारण घरात बसून तरी काय करणार ? आणि हल्लीच्या मुलींबद्दल पण काय काय ऐकायला येतं ..... आणि दिसायला सुंदर नाजुकशी अशी हवी. हल्ली मुली किती जाड असतात....अरे आणि आपल्या घरात तरी मुलगी कुठाय ? तिनेही राहावं की मुलीसारखं आपलं घर समजून......आणि अआपल्याकडे काही कमी आहे का ? आहे सगळं परमेश्वर कृपेने ...तुम्हाला काही म्हणजे काssssssss ही करायला नकोय. ......"

" hallo , कोण बोलतंय ? हां हां तुम्ही होय ? हो हो मेल मिळालीय तुमची, अहो पण त्यात तुम्ही लिहिलंय कि मुलाला एक बहिण आहे म्हणून आणि ती पुण्यातच असते. पण मग तिचं जाणे येणे किती असते तुमच्या घरात ?.....हो बरोबर आहे , तिचं ही घर आहे हे मान्य आहे मला, पण कसं आहे ना हल्ली लग्न झालेल्या मुलींचं पण प्रस्थ असत हो घरात .. आणि आमच्या बबडीला काही म्हंजे काही करायची सवय नाहीये. आणि मी मुद्दामच कामाची सवय लावली नाहीये तिला . बबडी म्हणजे तेच हो प्राची च. लाडाने आम्ही बबडी म्हणतो तिला. तशी ती फार flexible आहे बर का !!! ज्या घरात जाईल ना ते भाग्यवान. ........"

**२) लक्ष्मी नारायणाचा जोडा**

लक्ष्मी नारायणाचा जोडा ही आपल्याकडची एकदम पॉप्युलर संकल्पना. आणि गम्मत म्हणजे ही संकल्पना सगळी बाह्य गोष्टींवर अवलंबून असते. म्हणजे उंची , वय, वर्ण , शिक्षण , पगार या गोष्टी कशा साजेशा आणि अनुरूपच असायला हव्यात.

उंचीच्या बाबतीत पण सगळी मंडळी भारी संवेदनशील असतात. जोडा एकमेकांना शोभून दिसला पाहिजे असे वारंवार बोलले जाते. तसे पाहिले तर आयुष्यात एकदाच फक्त स्वतःच्या लग्नातल्या रिसेप्शन ला आपण नवरा बायको शेजारी शेजारी उभे राहतो. त्यानंतर शेजारी शेजारी उभे राहिलेले नवरा बायको मी तरी पाहिलेले नाहीत. त्यातल्या त्यात आपल्या मुला- मुलींच्या लग्नात आई वडील शेजारी शेजारी उभे राहतात, पण त्या वेळेपर्यंत पुलाखालून इतके पाणी वाहून गेलेले असते कि त्यावेळी हा उंचीचा मुद्दा रद्दबातल झालेला असतो.

३ ) **अरेंज्ड marriage**

तसेही लग्न अरेंज्ड चं करायचे आहे ना ? मग कशासाठी तडजोड करायची ? अगदी जसा हव्वा तस्साच जावई/ किंवा हव्वी तशी सून मिळाला/ मिळाली पाहिजे. पहिल्याच स्थळा कुठे हो म्हणायचं ? आत्ता तर सुरुवात केलीय. जरा एक दोन वर्षे जातातच असे वाटले होते. पण त्यामुळे अगदी पहिल्याच स्थळा ला कुठे होकार द्यायचा ? आणि तडजोड तरी का करायची ? प्रत्येकच गोष्ट मनासारखी मिळायला हवी.

**४) मुलामुलींबरोबर विश्वासाचे नाते नाही / घरात सुसंवादाचा अभाव**

अनेकदा तर कोणत्याही विवाहसंस्थेत नाव नोंदवताना पालक आपल्या मुला- मुलींना विश्वासात घेतच नाहीत. त्यांना न सांगताच नाव नोंदवले जाते. बर कधी कधी नाव नोंदवताना सांगत असतीलही, पण त्यानंतर नात्र अनेकदा त्यांना बऱ्या वाटलेल्या स्थळांना पालकच इंटरेस्ट पाठवतात , किंवा एखाद्याकडून आलेल्या इंटरेस्ट ला आपल्या पाल्यांना न विचारता तो इंटरेस्ट नाकारतात.

घरात जर मुलगा किंवा मुलगी लग्नाची असेल तर त्यांच्याशी घरात फक्त आणि फक्त त्यांच्या लग्नाबद्दल च बोलले जाते. जणू काही जगातले सगळे विषय संपलेत.

**५ ) कुंडली match करून पाहण्याचे प्राबल्य**

पत्रिका पाहण्याचे प्रमाण विलक्षण वाढले आहे. पत्रीकेचेच जवळ जवळ किमान दहा तरी मुद्दे असतात. गण, गोत्र ,नक्षत्र ,रास , ग्रह ( त्यात शुभ ग्रह – पाप ग्रह ). या मुद्द्यामध्ये अनेकदा मुला- मुलींचे आणि त्यांच्या आई वडिलांचे एकमत असतेच असे नाही. म्हणजे कुणाला तरी पत्रिका पहायची असते तर कुणाला तरी पत्रिका नसते पहायची.

१९७२ च्या सुमारास रत्नाकर मतकरींचे ' प्रेमकहाणी ' नावाचे नाटक आले होते. त्यात देखील पत्रिकेचा विषय हाताळला आहे. केवळ पत्रिका जमत नाही त्यावेळी लग्नाला विरोध झालेला नाटकात दाखवला आहे. आज २०१८ साली म्हणजे तब्बल ४५ वर्षांनंतरही पत्रिकेचा विळखा काही सुटलेला नाही. उलट तो जास्तच जास्त आवळत चालला आहे असे दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते. हे नक्कीच सुसंस्कृत समाजाचे लक्षण असल्याचे चिन्ह नाही.

**६) पैशाला आलेले अवास्तव महत्व –**

लग्न या संपूर्ण प्रक्रियेत पैशाला अत्यंत अवास्तव महत्व आलेले आहे. जगायला पैसा हवा, पैशाशिवाय काही होत नाही हे खरंच. पण पूर्वीच्या गरज सुविधा आणि चैन या शब्दांच्या अर्थासहित संकल्पनाच बदलल्या आहेत असे दिसते. त्यामुळे मुलाच्या / मुलीच्या स्वभावापेक्षा त्याच्या/ तिच्या package ला महत्व आले आहे. कमी पैसे मिळवणाऱ्या मुलाचे/ मुलीचे लग्न होताना अडचणी वाढल्याचे दिसून येत आहे. स्वतः मुलगी कितीही पैसे मिळवत असली ( कमी किंवा जास्त ) तरी तिला खूप जास्त पैसे मिळवणारा मुलगा हवा असतो.

**७) लग्न –एक सोहोळा**

लग्न हा विचार मनात येताच ते कसे व्हायला पाहिजे हेच जास्त मनात येते. लग्न, त्याचा सोहोळा, त्याची तयारी , कपडे , मानपान , कोणत्या कार्यालयात लग्न करायचे इत्यादी गोष्टींचा तपशीलवार विचार मनात अगदी पक्का असलेला दिसतो.

कपडे कसे असायला हवेत , संध्याकाळी रेसेप्षण ला गौण घालायचा कि शरारा घालायचा ? याचे planning अगदी सुरुवातीपासूनच असते. ज्यावेळी लग्न ठरलेले देखील नसते. इतकेच काय पण लग्नाचे पाहायला सुद्धा सुरुवात झालेली नसते.

असे अनेक मुद्दे आहेत.

यातल्या प्रत्येक मुद्द्याबद्दल आपण सविस्तर बोलणार आहोत पुढच्या लेखात. तोपर्यंत तुम्हाला या बद्दल नेमकं काय वाटतंय हे जाणून घ्यायला आवडेल .

- गौरी कानिटकर